15-02-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/14/2025 11:11 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड

वेर्णा, शनिवार, १५ फेब्रुवारी २०२५ | पान २




# खाण घोटाळ्याप्रकरणी कामतांसह १७ जण दोषमुक्त

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १४ : राज्यात गाजलेल्या खाण घोटाळ्यातील एका प्रकरणातून माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्यासह १६ जणांना पणजी जिल्हा सत्र न्यायालयाने शुक्रवारी दोषमुक्त केले. कामत यांच्यावर मुदत संपवूनही खाण लीज सुरूच ठेवण्यास परवानगी दिल्याचा आरोप ठेवण्यात आला होता.**

२००७ ते २०१२ या दरम्यान कामत हे मुख्यमंत्री तसेच खाणमंत्री असताना ३५ हजार कोटी रुपयांचा खाण घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणी खाण खात्याचे तत्कालीन संचालक प्रसन्ना आचार्य यांनी तक्रार केली होती. त्यानंतर सरकारने एसआयटीकडे या प्रकरणाचा तपास सोपविला होता. एसआयटीने याप्रकरणाचा तपास करून सन २०१८ मध्ये सदर प्रकरणी सत्र न्यायालयात तब्बल ७०० पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. या आरोपपत्रात दिगंबर कामत यांच्यासह खाण उद्योजक रविंद्र प्रकाश, प्रशांत साहू, मॅग्नम मिनरल्स प्रा. लि., प्रभावती वैकुंठ काडणेकर, काशिबाई रायकर ऊर्फ शिल्पा काडणेकर, रामकृष्ण रायकर, सरस्वती चोडणकर ऊर्फ सीमा शिवानंद काडणेकर, तत्कालीन खाण अधिकारी हेक्टर सी. एम. सी. फर्नांडिस, अजित वैकुंठ काडणेकर, प्रेमानंद काडणेकर, माधवराव काडणेकर, वैकुंठराव शिवानंद काडणेतर, नीना काडणेकर, रेखा काडणेकर, आग्नेलो टी. डिसोझा व रामनाथ शेटगावकर यांचा समावेश होता. या प्रकरणात २५ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली होती.



## प्रकरण काय?

सांगे आणि केपे येथील काडणेकर माईन्समधून मॅगमन प्रा. लिमिडेटने बेकायदा खनिजाचे उत्खनन केले व त्यानंतर चीन येथे सुमारे २ मिलियन टन खनिजाची निर्यात केली. २००७ ते २०१२ या दरम्यानच्या काळात हे बेकायदा खनिज उत्खनन झाले असून मॅगमन प्रा. लिमिडेट हे काडणेकर माईन्ससाठी कंत्राटदार म्हणून होते.

# 'फक्त चार तास पाणी हे सरकारचे अपयश'

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १४ :** प्रत्येक घराला चोवीस पाणी पुरवणे शक्य नाही मात्र २०२६ च्या अखेरीस राज्यातील प्रत्येक घराला दिवसाला किमान चार तास पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याच्या मुख्यमंत्र्याच्या विधानावर पर्यावरण प्रेमी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

नद्या, ओढे आणि झऱ्यांच्या पाणलोट क्षेत्रांचे संरक्षण करण्यासाठी सरकारकडे कोणतेही धोरण नाही. सरकार जल धोरणाबद्दल बोलते, पण जलसंपत्तीच्या संरक्षणासाठी कोणताही ठोस प्रयत्न करत नाही. असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ञ राजेंद्र केरकर यांनी व्यक्त केले आहे. राज्यातील जंगलतोड मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्यामुळे नद्यांमध्ये गाळ साचतो आहे. परिणामी, जलस्त्रोतांच्या पाणीसाठवण्याच्या क्षमतेवर मोठा परिणाम होत आहे. विद्यमान जलसाठ्यांचेही संरक्षण होत नाही असे केरकर यांनी स्पष्ट केले.

गांजे –उसगाव येथील रहिवासी रोहन नाईक, जे गावातील अनियमित पाणीपुरवठ्यावरून उच्च न्यायालयात गेले होते, त्यांनी देखील सरकारच्या या अपयशावर बोट ठेवले आहे. मुख्यमंत्री आधी २४७ पाणीपुरवठ्याची हमी देत होते, आणि आता फक्त चार तास पाणी पुरवण्याबद्दल बोलत आहेत. पण आमच्या गावात तर अजूनही पाणीपुरवठा अनियमित आहे,असे नाईक यांनी सांगितले.

मे २०२४ मध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी गांजे – उसगावमध्ये सर्वेक्षण केले होते. त्यांनी ४० घरे तपासली, आणि प्रत्येक घरातून पाणीटंचाईच्या तक्रारी आल्या. रहिवाशांना बोअरवेल, ओढे आणि तलावांवर अवलंबून राहावे लागत असल्याचे निष्पन्न झाले. ओपा वॉटर ट्रीटमेंट प्लांटमध्ये १६.७ एमएलडी पाण्याची कमतरता असताना आम्हाला पाणी मिळणार कसे ? सरकार २५ एमएलडी क्षमतेचा नवीन प्रकल्प गांजे येथे उभारणार असल्याचे सांगत आहे, पण अद्याप कोणतीही हालचाल दिसत नाही,असे नाईक यांनी सांगितले

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने राज्यातील बहुतांश भागांना चोवीस पाणी मिळते, असा दावा केला. पणजी आणि काही निवडक भागांमध्ये दिवसातून फक्त चार तास पाणीपुरवठा केला जातो,असे ते म्हणाले. बार्देश तालुक्यातील काही भागात अलीकडेच तिलारी कालव्याला फुट पडल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. ओपा वॉटर ट्रीटमेंट प्लांटमधून पणजी आणि तिसवाडी तालुक्याच्या संपूर्ण भागांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, त्याच पाइपलाइनमधून इतर भागांनाही पाणी पुरवले जात असल्याने मागणी वाढत असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सरकारने सात नवीन जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा आणि विद्यमान प्रकल्पांचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या प्रकल्पांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार, याबाबत निश्चितता नाही. राज्यातील वाढत्या जलसंकटाच्या पार्श्वभूमीवर, सरकारच्या वचनबद्धतेबाबत लोकांमध्ये शंका निर्माण झाली आहे. २४७ पाणीपुरवठ्याचे स्वप्न साकार होईल की सरकारची आश्वासने हवेत विरतील, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## निवडक

### सत्येंद्र जैन यांच्यावर अटकेची टांगती तलवार

नवी दिल्ली, दि. १४ : केंद्रीय गृह मंत्रालयाने मनी लॉंड्रिंग प्रकरणात आप नेते सत्येंद्र जैन यांच्यावर खटला चालवण्यासाठी राष्ट्रपतींकडे परवानगी मागितली आहे. दिल्लीचे माजी आरोग्यमंत्री जैन यांच्याविरुद्ध बीएनएसच्या कलम २१८ अंतर्गत मंजुरीची मागणी करण्यात आली आहे.

ईडी आणि गृह मंत्रालयाचे हे पाऊल सत्येंद्र जैन यांच्याविरुद्ध सुरू असलेल्या कायदेशीर कारवाईचा एक महत्त्वाचा भाग मानले जात आहे. राष्ट्रपतींकडून मंजुरी मिळाल्यास, त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली जाईल आणि जैन यांना अटक देखील केली जाऊ शकते. अंमलबजावणी संचालनालय (ईडी) ने केलेल्या तपासाच्या आणि पुरेशा पुराव्यांच्या आधारे मंत्रालयाने ही विनंती केली आहे. कथित हवाला व्यवहारांशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात तपास संस्था सीबीआयने २०१७ मध्ये जैन यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता आणि ईडीने तपास हाती घेतला होता. त्यांना ३० मे २०२२ रोजी अटक करण्यात आली.

---

### पूजा खेडकरच्या अटकेवरील स्थगितीत वाढ

नवी दिल्ली, दि. १४ : सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी माजी प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर यांच्या अटकेवरील स्थगिती १७ मार्चपर्यंत वाढवली. १५ जानेवारी रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीत न्यायालयाने अटकेला स्थगिती दिली होती. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती सतीशचंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने खेडकर यांना तपासात सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होईल. खेडकर यांच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांनी न्यायालयाला सांगितले की, खेडकर तपासात सहकार्य करत आहेत. परंतु पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी बोलावले नाही. त्याच वेळी, पूजा यांच्या अटकपूर्व जामीन अर्जाला नकार देण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उत्तर दाखल करण्यासाठी न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिलेला वेळही वाढवला आहे.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ८७,७७० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ९९,५०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७६,२९३.६० ↑ (१०१८.२०)

निफ्टी : २३,०७१.८० ↑ (३०९.८०)

# तन्वी वस्त प्रकरण : १६४ पानी आरोपपत्र; दीड कोटींची फसवणूक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** कुडचडे पोलिसांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या काकोडा शाखेतील बँक फसवणुकीच्या प्रकरणात मुख्य आरोपी तन्वी वस्त आणि शाखा व्यवस्थापक आनंद जाधव यांच्या विरोधात दीड कोटींच्या फसवणुकीसाठी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आहे. हे आरोपपत्र न्यायिक दंडाधिकारी प्रथम श्रेणी, केपे यांच्या न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

तन्वी वस्तच्या अटकेनंतर पोलिसांनी बँक फसवणुकीची अनेक प्रकरणे उघडकीस आणली. तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक अरुण एंड्रो यांनी दाखल केलेल्या १६४ पानांच्या आरोपपत्रानुसार, कुडचडे येथील रहिवासी रोझालिना कोरिया अँथनी डायस यांनी आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, २ जुलै २०२४ रोजी, तन्वी वस्त, जी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, कुडचडे शाखेत व्हिजन इंडिया या संस्थेची प्रतिनिधी म्हणून कार्यरत होती, तिने तक्रारदाराचा विश्वास संपादन करून तिचे सोन्याचे दागिने सुरक्षित ठेवण्याच्या बहाण्याने घेतले. मात्र, १८ नोव्हेंबर २०२४ रोजी तक्रारदाराच्या लक्षात आले की, तिच्या दागिन्यांची अदलाबदल करण्यात आली आहे.

यामध्ये तक्रारदाराचे अंदाजे रु. २५ लाख किमतीचे सोन्याचे दागिने, ज्यात नेकलेस, दोन साखळ्या, पाच बांगड्या, दोन अंगठ्या आणि कानातले यांचा समावेश होता, ते बदलून कमी मूल्यातील धातूचे दागिने देण्यात आले. याशिवाय, बँक खात्यातून मोबाईल बँकिंगच्या मदतीने रु. ५.५ लाख रक्कमही अपहार करण्यात आला.

कुडचडे पोलिसांनी बीएनएस २०२३ च्या कलम ३०५ आणि ३१८ (४) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिस तपासात उघड झाले आहे की, काही प्रकरणांमध्ये तन्वी वस्तने खातेदारांच्या संमतीशिवाय त्यांच्या खात्यातील रक्कम स्वतःच्या खात्यात हस्तांतरित केली. विशेषतः, वृद्ध खातेधारक हे तिचे लक्ष्य होते. आरोपी तन्वी वस्तने बँक व्यवस्थापक आनंद जाधव यांच्याशी संगनमत करून खातेधारकांचा विश्वास मिळवला आणि त्यांच्या बचतीवर डोळा ठेवत गैरव्यवहार केला,असे पोलिस सूत्रांनी सांगितले. पोलिसांनी मुदत ठेव स्लिप जप्त केल्या असून बँकेकडून आणखी पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे.

या प्रकरणात कुडचडे येथील क्रिस्टालिना कुतिन्हो यांची रु. १४.२८ लाख, सुषमा दिनेश कुमार अस्थाना यांची रु. २९.६९ लाखांची फसवणूक झाल्याचे आढळले आहे. याशिवाय, पोलिसांनी रु. १८.५ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त केले असून, तन्वी वस्तच्या चार वेगवेगळ्या बँक खाती शोधून काढली आहेत.बँक फसवणुकीच्या या प्रकरणात आणखी काही आरोपी असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तपास यंत्रणा संबंधित बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चौकशी करत असून, आणखी आर्थिक गैरव्यवहार उघड होण्याची शक्यता आहे.

# डॅनियली मॅकलॉग्लीन खूनप्रकरणी ८ वर्षांनी विकट भगत दोषी

## मडगाव सत्र न्यायालय सोमवारी सुनावणार शिक्षा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १४ :** गोव्यात पर्यटक म्हणून आलेल्या आयरीश–ब्रिटीश नागरिक डॅनियली मॅकलॉग्लीन (२८ वर्षे) या युवतीचा बलात्कार करून खून केल्याप्रकरणी विकट भगत याला दक्षिण गोवा सत्र न्यायालयाने दोषी ठरविले आहे. न्यायाधीश क्षमा जोशी यांनी विकट भगत याला बलात्कार करणे, खून करणे व पुरावे नष्ट करणे या आरोपांखाली दोषी ठरविले आहे. दोषी ठरविल्यानंतर शिक्षा सुनावण्यासंदर्भात युक्तीवाद पूर्ण झाले आहेत. सोमवारी १७ फेब्रुवारीला आरोपीला शिक्षा सुनावण्यात येणार आहे.

न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविल्यानंतर शिक्षा सुनावण्यासंदर्भात झालेल्या युक्तीवादाच्या वेळी सरकारी वकिलांनी आरोपीने केलेला गुन्हा अतीगंभीर असल्याने, त्याला मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी केली. आरोपीचे वकील अरुण ब्राझ डिसा यांनी आपल्या अशिलाविरुद्ध कुठलाही पुरावा नसल्याने, त्याला शिक्षा सुनावताना याची नोंद घेऊन कमीत कमी शिक्षा देण्याची मागणी न्यायालयापुढे केली. दोन्ही बाजूचे युक्तीवाद ऐकून घेऊन न्यायाधीश क्षमा जोशी यांनी सोमवारी १७ फेब्रुवारी रोजी शिक्षा सुनावण्यात येणार असल्याचे घोषित केले. मयत डॅनियलीची आई, बहीण व इतर कुटुंबिय न्यायालयात उपस्थित होते. निवाड्याचे त्यांनी स्वागत केले. निवाड्यानंतर कुटुंबियांना हुंदका आवरणे कठीण झाले. सांगितले की, अखेर आठ वर्षांच्या संघर्षानंतर व न्यायालयीन लढाईनंतर न्याय मिळाला. न्यायदेवतेचे आभार मानत असल्याचे सांगितले.




१४ मार्च, २०१७ रोजी वरील खूनप्रकरण घडले होते. पाळोळे समुद्र किनाऱ्यापासून काही अंतरावर राजबाग येथे जंगलात डॅनियली मॅकलॉग्लीन या युवतीचा मृतदेह सापडला होता. त्यावेळी अंगावर कपडे नव्हते. खूनापूर्वी, लैंगिक अत्याचार झाल्याचे ही वैद्यकीय चाचणीत उघड झाले होते. हे प्रकरण घडल्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याचे पडसाद उमटले होते. काणकोण पोलिस स्थानकाचे तत्कालीन निरीक्षक फिलोमॅन कॉस्ता यांनी या प्रकरणाचा तपास केला होता. तर नंतर तत्कालीन पोलिस निरीक्षक तथा विद्यमान उपअधीक्षक राजेंद्र प्रभुदेसाई यांनी पुढील तपास करून आरोपपत्र दाखल केले होते.

# अदानी प्रकरणावर पंतप्रधान मोदींचे मौन; विरोधकांचा हल्लाबोल

**वॉशिंग्टन, दि. १४ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अब्जाधीश उद्योगपती गौतम अदानी यांच्या विरोधातील लाचखोरी आणि फसवणुकीच्या आरोपांबाबत कोणतेही स्पष्ट उत्तर दिले नाही. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत पंतप्रधान मोदींना या प्रकरणावर विचारले असता, त्यांनी हे व्यक्तिगत प्रकरण असल्याचे सांगत त्यावर भाष्य करण्यास नकार दिला. मोदींच्या या भूमिकेवर विरोधी पक्षांनी जोरदार टीका केली आहे.

भारत एक लोकशाही राष्ट्र आहे आणि आमची संस्कृती 'वसुधैव कुटुंबकम' या तत्त्वावर आधारित आहे. आम्ही संपूर्ण जगाला एक कुटुंब मानतो. त्यामुळे अशा व्यक्तिगत बाबी दोन देशांच्या नेत्यांमध्ये चर्चेचा विषय बनू शकत नाहीत, असे मोदी यांनी ट्रम्प यांच्यासमोर स्पष्ट करीत अदानी प्रश्नाला बगल दिली.

पंतप्रधान मोदींनी अदानी प्रकरणावर मौन बाळगल्याने विरोधकांनी त्यांच्यावर टीका केली आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदींवर हल्लाबोल करताना म्हटले, देशात प्रश्न विचारले तर ते मौन बाळगतात आणि परदेशात त्याला 'वैयक्तिक बाब' म्हणतात ! अमेरिकेतही मोदींनी अदानींचा भ्रष्टाचार झाकण्याचा प्रयत्न केला. मोदींसाठी मित्रांचे खिसे भरणे म्हणजे राष्ट्र उभारणी, तर लाचखोरी आणि देशाच्या संपत्तीची लूट ही त्यांच्या दृष्टीने 'वैयक्तिक बाब' आहे. तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार साकेत गोखले यांनीही मोदींवर निशाणा साधला. अमेरिकेत पंतप्रधानांना पत्रकार परिषद घ्यावी लागली यातून हेच स्पष्ट होते की ते भारतात पत्रकारांचे प्रश्न का घेत नाहीत. भारतातील त्यांच्या मुलाखती पूर्वनियोजित आणि लिखित असतात. पत्रकाराने अदानी प्रकरणावर प्रश्न विचारल्यावर मोदी



संतप्त आणि अस्वस्थ झाले, असा आरोप गोखले यांनी केला. विरोधकांनी वारंवार पंतप्रधान मोदी आणि अदानी यांच्यातील कथित साठगाठ उघड करण्याची मागणी केली आहे. अदानी समूहाविरोधात संसदीय समितीद्वारे सखोल चौकशी करावी, अशी मागणी विरोधकांनी केली आहे. गेल्या वर्षी अमेरिकेत गौतम अदानी, त्यांचा पुतण्या आणि इतर अनेकांवर लाचखोरी आणि सिक्युरिटीज फसवणुकीचे आरोप लावण्यात आले होते. २०२० ते २०२४ या कालावधीत भारतातील सौरऊर्जा करारांबाबत अदानी समूहाने राज्य सरकारी अधिकाऱ्यांना तब्बल २,०२९ कोटी रुपयांच्या लाचेचे आश्वासन दिल्याचा आरोप अमेरिकन अभियोक्त्यांनी केला आहे. काही दिवसांपूर्वीच गौतम अदानी, त्यांचा पुतण्या सागर अदानी यांच्यासह आठ जणांविरोधात फसवणुकीचे आरोप निश्चित करण्यात आले आहेत. अदानी समूहाने मात्र हे आरोप फेटाळले असून, त्यांना कोणताही कायदेशीर आधार नसल्याचा दावा केला आहे. दरम्यान, अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने परदेशी भ्रष्टाचार कायद्याच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली असून, अदानी प्रकरणालाही याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भारत व्यापारी तूट कमी करण्यासाठी एफ–३५ लढाऊ विमानांसह अमेरिकेकडून अधिक तेल, वायू आणि लष्करी उपकरणं खरेदी करेल, अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर चर्चा झाल्यानंतर पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली.परंतु, अमेरिककडून भारताची 'परस्पर शुल्का'पासून सुटका नाही, असंही ट्रम्प यांनी स्पष्ट केलं आहे. ट्रम्प यांनी नुकतंच परस्पर शूल्काचा (रेसिप्रोकल टॅरिफ) अर्थ स्पष्ट केला होता.जितकं टॅरिफ इतर देश अमेरिकेवर लावतात. अमेरिका आता तितकंच टॅरिफ त्यांच्यावर लावेल, ना जास्त ना कमी, असं ते म्हणाले.

Kirloskar Appoints
New Authorized Service Dealer

kirloskar care

**Authorized Service Dealer Announcement**

This is to inform that Kirloskar Oil Engines Limited ("KOEL"), having registered office at Laxmanrao Kirloskar Road, Khadki, Pune - 411003, Maharashtra is pleased to announce the appointment of following authorised Service Dealers for KOEL products in the territory of the Districts of Solapur, Dharashiv, Ratnagiri & Sindhudurg in the state of Maharashtra and state of Goa, effective from 01-Apr-2024

Service Dealers Details:


**Mahalaxmi Diesels**

Address: House No.L-90, Phase IIE , Verna Industrial Estate, Verna, Goa 403722

**Contact: 7722070437**

Service Touchpoints: Kolhapur, Satara, Sangli, Karad, Solapur, Dharashiv, Pandharpur, Kankavali, Ratnagiri, Chiplun, Goa.

Please note, apart from above, there are no other Service Dealers authorised by KOEL in the territory as on date.



Engines Gensets

The customers are advised to avail service and undertake any transaction only through above authorised Service Dealers, and KOEL shall not be responsible for any transactions with any other entity/ party/ individuals who are not authorised by KOEL.

www.kirloskaroilengines.com
KIRLOSKAR OIL ENGINES LIMITED
A Kirloskar Group Company

880 633 4433
koel.helpdesk@kirloskar.com

Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by Kirloskar Proprietary Ltd. and Kirloskar Oil Engines Ltd. is the Permitted User.